पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १४

**सभावृत्तांत**

दिनांक - **०७/०२/२०१९** वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षीक सभा **गुरुवार** दिनांक **०७/०२/२०१९** रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.बाबर शर्मिला राजू - उपसभापती
३. मा.बुर्डे सुवर्णा विकास
४. मा.सोनवणे शारदा हिरेन
५. मा.तापकीर विनया प्रदीप(आबा)
६. मा.काळे उषा दिलीप
७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे – पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (शिक्षण विभाग) मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी यांना त्यांचे अकार्यक्षमतेमुळे शासन सेवेत परत पाठवून देणेबाबत - मा.सुवर्णा बुर्डे, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **१७/०१/२०१९** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक १३**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – ४७ विषय क्रमांक – ०१
दिनांक - ०७/०२/२०१९
सुचक : मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक : मा.शारदा सोनवणे
संदर्भ :- मा.सुवर्णा बुर्डे, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथिमक शिक्षण विभागाच्या १०५ शाळा कार्यरत असून या शाळांमध्ये अंदाजे ११५० मुख्याध्यापक / शिक्षक कार्यरत असून ३८,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तरी शिक्षण विभागावर नियंत्रण राखणेची संपूर्ण जबाबदारी प्रशासन अधिकारी श्रीमती ज्योत्सना शिंदे यांच्यावर आहे. तरी शिक्षण विभागात सद्यस्थितीत त्यांचे कामकाज चांगले नसून याबाबत मनपाच्या नगरसेवकांच्या व नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. तसेच त्यांना सोपवलिलेल्या कामाची प्रशासन अधिकारी ज्योत्सना शिंदे या टाळाटाळ करीत आहेत. तरी यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची प्रतिमा समाजात मलीन होत आहे. प्रशासन अधिकारी ज्योत्सना शिंदे यांच्या अशा कामकाजामुळे पिंपरी

चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील पट नक्कीच कमी होणार आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची प्रतिमा खराब होणार आहे. तरी त्यांना महाराष्ट्र शासनाकडे परत पाठविणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६२/२०१९
दिनांक : ०७/०२/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.